## दिनांक ४.१.२०२४ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक १३७ –** अमरावती स्थित मौजे - शेगांव, सर्व्हे क्र. 50/2/अ मधील 0 हे. 95 आर जागेवरील वि.यो.आरक्षण क्र. 9 प्राथमिक शाळा व आरक्षक क्र. 10 खेळाचे मैदान या आरक्षणातुन वगळुन रहिवास वापर क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करणेबाबत.

**ठराव क्रमांक १३७ –** अमरावती स्थित मौजे - शेगांव, सर्व्हे क्र. 50/2/अ मधील 0 हे. 95 आर जागा हि खाजगी मालकीची आहे. अमरावती शहराच्या मंजुर विकास योजना (सु) नुसार सदर जागेवरील वि.यो. आरक्षण क्र. 9 प्राथमिक शाळा व आरक्षक क्र. 10 खेळाचे मैदान या आरक्षण क्षेत्रात दर्शविलेली आहे. मौजे - शेगांव, सर्व्हे क्र. 50/2/अ मधील 0 हे. 95 आर जागेवरील वि.यो. आरक्षण क्र. 9 प्राथमिक शाळा व आरक्षक क्र. 10 खेळाचे मैदान या आरक्षणातुन वगळुन रहिवास वापर क्षेत्रात समाविष्ट करण्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधि. 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करण्यास शहर सुधार समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि सदर समिती सद्य:स्थितीत कार्यरत नसल्याने, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार प्राधिकरणाचे सर्व अधिकार प्रशासन यांचेकडे असल्याने सदर प्रस्ताव मंजुरी प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रदेशीक नियोजन व नगर रचना अधि. 1966 चे कलम 37 नुसार नागरीकांचे हरकती व सूचना नोंदवुन त्याबाबत फेरबदलाचा प्रस्ताव तयार करुन अंतिम ठराव पुन्हा मान्यतेकरीता नियोजन प्राधिकरणाकडे न पाठवता सरळ फेरबदल प्रस्ताव शासनाकडे सादर करावयाचे अधिकारही प्रशासनास देण्यात यावे.सदर प्रस्तावास मा. आयुक्त यांनी दि. 04/01/2024ला मान्यता प्रदान केली आहे.

उपरोक्त प्रशासकीय विषय शहर सुधार समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. परंतु; सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा व विषय समित्या अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजूर व कायम.

| | |
|---|---|
| स्वा./- | स्वा./- |
| नगर सचिव | प्रशासक |
| महानगरपालिका अमरावती | महानगरपालिका अमरावती |

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.